# :: प्रेस नोट ::

## आरोपी १) कैलाश शंकरराव गाडे, दुय्यम निबंधक, तहसिल कार्यालय साकोली, जि. भंडारा २) मुरलीधर अल्लुजी कराडे, अर्जनविस, तहसिल कार्यालय साकोली, जि. भंडारा यांना कारावासाची शिक्षा

तक्रारीने विकलेली शेती व तक्रारदाराचे पुतणीने खरेदी केलेला प्लॉट अशा दोन्ही जमीनीची रजिस्ट्री करण्याकरिता आलोसे यांनी १५०००/—रू लाचेची मागणी करून आरोपी क्र. २ यांच्या हस्ते १५०००/—रू लाचेची मागणी करून स्विकारल्याने त्यांचे विरूध्द दि. १७/१२/२०१४ रोजी पो.स्टे. भंडारा, जि. भंडारा अप.क्र. ३०६९/१४ कलम ७,८,१३(१)(ड), १३(२) ला.प्र.का. १९८८ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. सदर गुन्हयाचा तपास पुर्ण करून मा. न्यायालयात दोषारोप पत्र सादर करण्यात आले.

मा. श्री. संजय देशमुख, मा. प्रमुख जिल्हा सत्र न्यायाधिश भंडारा यांचे न्यायालयात सदर खटला चालविण्यात आला. दि. ३०/७/२०१९ रोजी मा. न्यायालयाने आरोपी आरोपी १) कैलाश शंकरराव गाडे, दुय्यम निबंधक, तहसिल कार्यालय साकोली, जि. भंडारा यांना कलम ७ लाप्रका मध्ये १ वर्षे सश्रम कारावास व ५०००/— रुपये दंड दंड न भरल्यास ३ महिने सश्रम कारावासाची शिक्षा व कलम १३(१)(ड) लाप्रका मध्ये २ वर्षे सश्रम कारावास व १०,०००/— रुपये दंड दंड न भरल्यास ६ महिने सश्रम कारावासाची शिक्षा तसेच आरोपी क्र. २) मुरलीधर अल्लुजी कराडे, अर्जनविस, तहसिल कार्यालय साकोली, जि. भंडारा यांना ८ लाप्रका. मध्ये २ वर्षे सश्रम कारावास व १०,०००/— रुपये दंड, दंड न भरल्यास ६ महिने सश्रम कारावासाची शिक्षा सुनावली आहे.

सदर गुन्ह्याचा तपास श्री किशोर पर्वेते, तत्कालीन पोलीस निरक्षक, पोहवा वाडीभस्मे, यांनी पुर्ण करुन न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले. सरकारी पक्षाचे वतीने जिल्हा शासकीय अभियोक्ता ॲड. विनोद भोले यांनी काम पाहिले व त्यांना श्री महेश चाटे, पोलीस उपअधीक्षक श्री पोहवा रविन्द्र गभने, पोशि संदीप पडोळे लाप्रवि भंडारा यांनी सहाय्य केले.

मा. श्रीमती रश्मि नांदेडकर, पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो नागपूर परिक्षेत्र तर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, कोणत्याही शासकीय कार्यालयामध्ये कोणी अधिकारी/कर्मचारी किंवा यांचे वतीने कोणी खाजगी ईसम लाचेची मागणी करीत असल्यास कृपया ॲन्टी करप्शन ब्युरो, कार्यालयाशी संपर्क साधावा.

SP ACB Nagpur-
Landline no. - 0712/ 2561520
Toll Free No. 1064
Website:- www.acbmaharashtra.gov.in
Mobile App:- www.acbmaharashtra.net
Facebook Page:- www.facebook.com/MaharashtraACB
Whatapp No- 9930997700